## अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... . ३२१-३४४

स्फुट विषय ... ... ... .. २६८-२९६

श्री साईसच्चरित ... ... ४८३-५०६


---

## विनंती

या मासिकाचे वर्ष चैत्रापासून सुरू असते. रुजून शके १८४६ चीही वर्गणी कित्येकांची आलेली नाहीं. गेल्या फाल्गुनचे अंकांत आग्रहाची विनंती केली असूनही पुष्कळ वर्गणीदाराकडून शके १८४७ सालची वर्गणी अजून आलेली नाहीं. तरी वर्गणीदार आपली वर्गणी वेळेवर पाठवितील अशी उमेद आहे.

---

## वर्गणीचे दर

वार्षिक टपाल खर्चासह मनिआर्डरीनें अगाऊ रु. ३।= व्ही. पी. नें रु. ३॥=, चालू अंकाची -।=, मागील अंक शिल्लक असल्यास -॥-.

## नोटीस.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांच्या नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफीस. ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें. बी. बी. रेल्वे.

## पोंच.

'प्रभु-प्रभात' या मासिकाच्या ३ ऱ्या वर्षाच्या २ ऱ्या अंकांत कोणी श्री साईभक्तानें "श्रीसाई लीला" मासिक पुस्तकाची जाहिरात देऊन तो अंक आमचेकडे पाठविला आहे. त्याबद्दल श्रीसाईभक्ताचे आम्हीं फार आभारी आहोंत. त्यांची ही सेवा श्री चरणीं खास रुजू होईल. श्रीसाई भक्तानें आपलें नांव, प्रसिद्धी करितां नव्हे, परंतु आमचे माहितीकरितां आम्हांला कळविल्यास फार आभारी होऊं.

---

"गेल्या अंकांत जाहीर केल्याप्रमाणें या जोड अंकाला ८० पृष्ठां-ऐवजीं फक्त ७२ पृष्ठेंच देऊन ८ कमी केलीं आहेत" आ.

दाभोळकर

## रा. रा. मोरेश्वरराव विश्वनाथ प्रधान [illegible] मुंबई [illegible] यांचे श्री साईबाबांविषयींचे अनुभव

### ॥ श्री साईबाबा समर्थ ॥

एकदा असे झाले की, आमच्या घरातील सर्व मुलांस गोवर आला त्यांत एका मुलास फारच आला, व स्वभावतः तो अशक्त असल्याकारणाने ४।५ दिवसानंतर तो मुलगा आजची रात्र काढीत नाही असे डॉक्टरास वाटून त्याने जातेवेळीं तो मुलगा आजची रात्र काढणार नाहीं असे घरातील इतर मंडळीस स्पष्ट सांगितले. डॉक्टर गेल्यानंतर सर्व मंडळींची तोंडे मला उतरलेली दिसलीं. व मुलगा तर अगदीं थकून गेलेला. कोणास विचारिले तर ते काय मला खरे सांगणार ? म्हणून विचारण्यापेक्षा मी श्री समर्थ साईबाबांची प्रार्थना करूं लागलें कीं, हे बाबा मला तुम्ही शिर्डीस कशी नेलीत हे तुम्हासच ठाऊक व तुमच्या नजरेखालीं येताक्षणींच तुम्ही कोणाची कोणत्या प्रकारची नड न ठेवता माझे नशिब एकदम सुधारून टाकिलेत व हे काय ? आतां तुमच्याशिवाय कोण त्राता अशा अनेक प्रकारच्या विचाराने क्षणोक्षणीं श्री मायमाऊलीने बाबांची प्रार्थना सुरू केली. ४ दिवस जरी त्या मुलाकरिता रात्रंदिवस बसून काढले तरी त्या दिवशीं (म्हणजे अशा आणीबाणीच्या वेळीं) मला झोंप लोटली. मनांत म्हणतें बाबा हीं दुश्चिन्हे होऊं लागलीं आता काय करूं ? ढोपरावर हात ठेऊन बाबांच्या नांवाचा जप सुरू केला. ५ मिनिटांत मला निद्रेनें घेरलेंच. मग मी स्वप्न पाहू लागलें.. तें असे-मूर्तिमंत श्रीसाईबाबा माझ्यासमोर उभे आहेत व मला म्हणतात अशी काय करतेस, मुलगा तर चांगला आहे तूं भितेस काय ? पैहा उद्यां तो अगदीं बरा होईल. व उद्या वेळेवर (म्हणजे संध्याकाळीं ६—६॥ वाजता) डॉक्टरनी हा बरा होणार नाहीं असें सांगितलें त्याच वेळेवर उद्यां तो जेवावयास मागेल. तू त्याला खाणें खुशाल दे भिऊं नकोस. मी बरें म्हटले. व त्या स्वप्नांत बाबांनी दुसरेही बरेंच सांगितलें व त्यानंतर मी दचकून जागी झालें. व पहातें तो बाबा नाहीत. कोठी

नाहीं. पण मुलगा मात्र स्वस्थ झोपलेला आहे व त्याच्या जवळ पहारा करीत बसलेली सर्व मंडळी त्याचा ताप उतरला म्हणून आनंदित दिसली. मी त्या जवळच्या मंडळीला विचारलें ताप किती आहे. मंडळी म्हणाली ताप थोडा आहे. आताच त्याने थोडे दुध घेतले व झोंपी गेला तूं त्याला त्रास देऊं नको. मी बरें म्हटलें. व स्वस्थ बसले मग माझे स्वप्न मी सर्वांस सांगितलें. सर्व म्हणू लागलीं "बाबा खरोखर तुला दृष्टांत देऊन गेले. कारण त्याचें तोंड पहा मघा कसे होते. व आता कसे आहे तें." पहाट होते तोंच त्या मुलाने आपलीं सर्व खेळणीं पलंगावर मागून तो खेळूं लागला. दुसऱ्या दिवशीं नेहमींपेक्षां डॉक्टर लौकर आले कारण इतर पडलेल्या मुलांना तरी नीट औषध वगैरे पोचावें म्हणून डॉक्टर बगीच्यांत शिरतांच माळ्यापासून जो मनुष्य भेटेल त्या जवळ माझ्या प्रिय बाळाची चौकशी करूं लागले. डॉक्टरना सर्वांनीं सांगितलें कीं, धाकटे बाबू खेळत बसले आहेत. डॉक्टर फार आनंदाने वर आले व मुलाला लावूनच पाहून त्यांना फारच नवल वाटलें व म्हणाले मला आजचा दिवस हा मुलगा पाहील असे वाटलें नव्हतें व जेवढी त्याची काल प्रकृति बिघडलेली होती तेवढी आज सर्व सुधारून तो एवढा आजारी नव्हताच असें वाटेल. परंतु त्याला कांहीं खावयास देऊं नका म्हणून डॉक्टरनें सावधगिरीची सूचना दिली. इकडे तर कालच्या स्वप्नाप्रमाणें ६॥ वाजले व मुलगा जेवण मागूं लागला. डॉक्टर म्हणतात ते देऊं नका. पण बाबाच्या हुकमाप्रमाणें त्याने जें कांहीं मागितलें तें मुलाला खावयास दिलें. त्याने तेथेच बसून खाल्ले व त्याचें पोट वगैरे कांहीं न बिघडतां नेहमींपेक्षां त्याने खाणें जास्त खाऊन तें जिरविलें. व दुसऱ्या दिवशीं डॉक्टरनें त्याला फक्त जिरण्याचें औषध ठेवलें व त्याच्या मागाहून किती तरी दिवसांनीं घरांतील दुसरी गोवर आलेलीं मुलें खाऊं पिऊं लागलीं.

एके वेळीं असें झाले कीं, आमचा मुलगा अगदीं बरा होता. व नेहमींप्रमाणें आमचे वेळेवर आम्हीं झोंपलों. रात्रीं ११ चे सुमारास मला स्वप्न पडले कीं, बाबा माझे समोर उभे आहेत व मला सांगतात झोपलीस

काय ? ऊठ. ह्या मुलास आतां आकडी ( Convulsion ) येईल मी दचकून जागी झाले. पहातें तर हे काय अजून ह्या मुलाला ताप नाहीं. काही खोकला नाहीं आणि मला तर बाबांनीं असे सांगितलें. काय करूं ? कांहीं सुचेनासे झाले. उठून बसलें. हळूहळू आकडीवर जेवढे उपचार माहीत होते तेवढे कपाटातून बाहेर काढून ठेवले, व आमच्या मुलांना आकडयांची संवय असल्याकारणाने आमच्या घरांत नेहमीं रात्रंदिवस शेगडीवर गरम पाणी असावयाचेच. सर्व तयार करून बसले तरी मुलाचे आग तापलेले नाहीं. परंतु आमचा बाबांचे स्वप्नावर पूर्ण भरंवसा, तेव्हां कांहींतरी असेल. निजून उपयोग नाहीं असे म्हणून बसले. दोहोंच्या सुमारास मुलगा एकदम हात वर वर करूं लागला व शुद्धींतून जात आहे तोच मी सर्वांस हांका मारून जागे केले व म्हणाले पहा ह्याला आंकडी येत आहे. जो तो झोपेतून उठलेला. कोणी कोलनवाटर करितां कपाट ओढतो, कोणी पाणी पाणी करतो. मी सर्वांना सांगितले ती पहा टेबलावर सर्व औषधांची तयारी आहे व खालून गरम पाणी व शेगडीही आणलेली आहे कोणी घाबरून जाऊं नका त्याला आतां बाबा हुशार करतील माझें धैर्य पाहून सर्वांना नवल वाटले, कारण बाबांनीं ज्या अर्थी अगाऊ असें स्वप्न दिले त्या अर्थी ते मुलाचे केसालासुद्धां धक्का लागूं देणार नाहीं अशी माझी पक्की खात्री होती. अर्ध्या तासानें मुलगा शुद्धीवर आला, आंकडीचा जोर मोडला त्यानंतर सर्व मंडळी मला म्हणूं लागली मुलाला आंता आंकडी येईल हे तुला आधीं कसें समजले व तूं सर्व तयारी कशी केलीस ? तेव्हां मी त्यां सर्वांना माझ्या प्रिय बाबाची लीला सांगितली. दुसऱ्या दिवशीं सकाळ डॉक्टर आणले पुढें ४।५ दिवस मुलगा आजारी होता परंतु त्यानंतर त्याला कधींही आंकडी आली नाहीं असे किती तरी अनुभव आज उभी १५ वर्षे बाबा देत आहेत. पण कांहीं कारणामुळें म्हणा अगर बाबांची इच्छा म्हणा आपले सर्व वेळोवेळींचे अनुभव जाहीर करावे असें मुळींच मनांत येत नसे. साईलीलेच्या मागिल अंकांतील "आत्मनिवेदन वांचून आपण कांहीं

तरी हातभार लावाना असे वाटल्यावरून जसजशी [illegible] नी
अनुभव पाठवीन असे म्हणते.

पूर्वी एके दिवशीं मला स्वप्नात बाबा म्हणाले कीं " पहा मी तुझ्या करता येथपर्यंत आलों आतां माझ्या पायावर हळदकुंकु घाल " मी स्वप्नात हळदकुंकु घातले. हार वगैरे अर्पण करून नैवेद्य पूजा केली. व दुसऱ्या दिवशीं सकाळींच रा. नानासाहेब चांदोरकर आमच्या येथे आले. त्यांना स्वप्ने विचारण्याची फार आवड असे. त्याप्रमाणे त्यांनीं सर्वांस विचारून मजवर जेव्हा पाळी आली तेव्हां मी वरील स्वप्न त्याना सांगितले. ते म्हणाले आतां तुम्हीं रुप्याच्या पादुका करा व केव्हा शिरडीस बाबाकडे जाल तेव्हा बरोबर न्या. व बाबांचे पायास लावून आणा. त्याप्रमाणे आमचा लवकर जाण्याचा सुयोग आला व आम्हीं पादुकाही नेल्या व नित्याप्रमाणे मी पूजा करून मग पायाला पादुका लावीन असे मनातले मनात म्हणत आहे तोंच बाबानीं एक पाय उभा व एकच पाय खालीं ठेविला होता त्या एका पायाची सर्वांनी पूजा केली पण अंतर्यामी माझ्या पादुकाविषयीं ठाऊक असलेल्या बाबांनीं मी त्याच्या पूजेस बसताच त्यांनीं पादुका नीट ठेवतां येतील असे दोन्ही पाय सारखे केले व मला म्हणाले कीं पायावर पादुका नीट ठेव. आणि पूजा कर. मग मी पायावर पादुका ठेऊन पुजा केली. व मी त्या उचलीन म्हणून बावांनीं स्वतः त्या पादुका उचलून माझे हातांत ठेवतेवेळेस नानासाहेबास म्हणाले " नाना हिने माझे पाय पहा कापून नेले ". असे प्रासादीक शब्द उच्चारिले. त्याप्रमाणे आम्हांवर किती जरी संकटे आलीं तरी ते आमचे पाठीराखे आहेतच अशी क्षणोक्षणीं खात्री करून दाखवितात. पांडवांना श्रीकृष्ण भगवानाचें येवढें पाठबळ असतांनासुद्धां प्रारब्ध कर्मानुसार त्यांनीं वनवास भोगला. व अनन्वीत संकटेहीं भोगलीं, तरीपण शेवटीं श्रीकृष्ण परमात्म्यानेंच त्यांना सम्राटपदास पोंचविले. त्याचप्रमाणें श्री साईबाबा आम्हीं आपले बरें वाईट प्राक्तन भोगतांना आमचेवर कृपादृष्टीच ठेवीत आहेत ह्याचा अनुभव आम्हांस प्रत्येक मिनिटास येत आहे.